1 3 DEC 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भाऊ पाध्ये यांच्या 'राडा' या कादंबरीच्या हिंदी अनुवादाचे प्रकाशन करताना डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. अविनाश सप्रे, व्ही. एन. शिंदे, गोरख थोरात, चंद्रकांत पाटील, रणधीर शिंदे.

# भाऊ पाध्ये अनुभववादी साहित्यिक

## प्रा. अविनाश सप्रे; विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १२ : 'भाऊ पाध्ये हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे अनुभववादी, मानवतावादी लेखक होते. समस्त प्रस्थापित मांडणी व संकेतांना छेद देणारे आणि प्रस्थापित चौकटी झुगारून देत जगण्याचे अराजक मांडणारे लेखन हे त्यांच्या समग्र साहित्यव्यवहाराचे वैशिष्ट्य होते', असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक व समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे पी. एम. उषा योजनेंतर्गत साठोत्तरी काळातील अग्रगण्य लेखक भाऊ पाध्ये यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'भाऊ पाध्ये यांचे वाङ्मय : आकलन आणि पुनर्विचार' या विषयावरील दोनदिवसीय चर्चासत्रास आज प्रारंभ झाला. त्यावेळी बीजभाषण करताना प्रा. सप्रे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. ज्येष्ठ कवी, प्रा. चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले.

'अत्यंत चौफेर आणि खुलेपणाने, अनुभवाला थेट भिडणारे लेखन भाऊंनी केल्याने ते अनुभववादी लेखक ठरतात. मानवी समाजात अस्तित्वात असलेल्या सर्व विसंगतींसह निर्माण झालेल्या अनेक आवाजांचे मिश्रण त्यांच्या साहित्यात आढळते म्हणून ते वेगळे आणि श्रेष्ठ ठरते. ते समजून घेण्यासाठी भाऊंच्या समग्र साहित्याचे पुनर्वाचन आवश्यक ठरत असल्याचे प्रा. सप्रे यांनी सांगितले.

या कार्यक्रमात पाध्ये यांच्या 'राडा' या गोरख थोरात अनुवादित हिंदी कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. माया पंडित, उदय नारकर, डॉ. श्रीराम पवार, सचिन परब, शरद नावरे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रभंजन माने, नीलांबरी जगताप, किरण गुरव, अमित नारकर, अवधूत डोंगरे, प्रसाद कुमठेकर उपस्थित होते.

**पाध्ये यांच्याकडे एक वेगळी दृष्टी**

प्रा. चंद्रकांत पाटील म्हणाले, 'लघुनियतकालिक चळवळीला बळ देणारा प्रणेता भाऊ पाध्ये होते. कामगार चळवळीत त्यांचे संपूर्ण आयुष्य गेले. त्यामुळे येथील अधोसंस्कृतीकडे पाहण्याची त्यांची म्हणून एक वेगळी दृष्टी होती.'

13 DEC 2025
सकाळ

# केवळ प्रयोगशाळेत संशोधन करून थांबू नका

## भरत गीते; आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र परिषदेचा समारोप



**भरत गीते**

कोल्हापूर, ता. १२ : केवळ प्रयोगशाळेतील चार भिंतींच्या आत संशोधन करून थांबून चालणार नाही. त्या संशोधनाचे रूपांतर प्रत्यक्ष उत्पादनात आणि व्यापारात झाले पाहिजे. देशाला खऱ्या अर्थाने स्वावलंबी आणि विकसित बनवण्यासाठी 'ॲकॅडेमिया आणि इंडस्ट्री'मध्ये थेट संवाद होणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या तरुल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि भारताचे 'ॲल्युमिनियम मॅन' भरत गीते यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. राजेंद्र सोनकवडे होते. भारताला ॲल्युमिनियम कास्टिंग आणि फॅब्रिकेशन क्षेत्रात जागतिक स्तरावर नेऊन ठेवणाऱ्या गीते यांनी विद्यार्थ्यांनी संशोधनाचे रूपांतर उद्योगात कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना 'लॅब टू फॅब्रिकेशन' मंत्र दिला. केवळ पेटंट मिळवून न थांबता त्याचे व्यापारीकरण कसे करावे आणि यशस्वी स्टार्टअप्स कसे उभे करावेत, याचे व्यावहारिक धडे त्यांनी दिले. आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिकचे डॉ. नानासाहेब थोरात, समन्वयक डॉ. नीलेश तरवाळ आदी उपस्थित होते. डॉ. राजीव व्हटकर, आण्णासाहेब मोहोळकर, केशव राजपुरे, मानसिंग टाकळे, एस. पी. दास, एम. आर. वाईकर, ए. आर. पाटील यांनी परिषदेचे संयोजन केले. डॉ. सत्यजित पाटील यांनी आभार मानले.

दरम्यान, परिषदेच्या सकाळच्या सत्रात दक्षिण अमेरिकेतील चिली येथील डॉ. संतोष नंदी यांनी नॅनो स्ट्रक्चर्समधील अद्ययावत बदलांची माहिती दिली.